**१२ ऑगस्ट, २०२०**

# डी एस कुलकर्णी डेव्हलपर्स लिमिटेड (डी एस के) यांच्या डिबेंचरहोल्डर्सच्या माहितीसाठी

डी एस के यांनी जारी केलेल्या डिबेंचर्सची वेळेत परतफेड न केल्यामुळे डिबेंचरहोल्डर्समध्ये चिंता व अस्वस्थता दिसते. डिबेंचर्सच्या परतफेडीच्या कारवाईबाबत माहिती वेळोवेळी www.catalysttrustee.com या वेबसाईटवर तसेच **"My Trustee"** या मोबाईल अँप्लिकेशनवर दिली जात आहे. तरी काही डिबेंचरहोल्डर्सच्या सूचनेनुसार आतापर्यंत झालेल्या घटनांचा गोषवारा देत आहोत.

**१.** डी एस के यांनी दिनांक ०५.०९.२०१४ रोजी डिबेंचर्स इश्यू केले, त्याकरिता फुरसुंगी, पुणे येथील ड्रीम सिटी या प्रकल्पातील, कांही जमिनीचे तारण म्हणून गहाणखत करून दिले.

**२.** जुलै / ऑगस्ट, २०१७ मध्ये डिबेंचरवरील व्याज वेळेवर न दिल्याने, कॅटॅलिस्टने ट्रस्ट डिड तसेच रेग्युलेशननुसार योग्य ती कारवाई अंतर्गत ६० दिवसांची नोटीस दिली.

**३.** नोव्हेंबर, २०१७ मध्ये, कंपनी कायदा, २०१३ नुसार माननीय एन. सी. एल. टि., मुंबई येथे अर्ज दाखल करून, डी एस के यांनी डिबेंचर्सची रक्कम परत द्यावी, असा हुकूम देण्यात यावा, अशी विनंती केली.

**४.** डी एस के यांनी २१ डिसेम्बर २०१७ रोजी घेतलेल्या मीटिंगमध्ये परतफेडीच्या वेळापत्रकात बदल व तारण जमिनीत अदलाबदल करण्याचा प्रस्ताव दिला. परंतु, डिबेंचरहोल्डर्सनी सदर दोन्हीही प्रस्ताव अमान्य केले.

**५.** कॅटॅलिस्टने, वसुलीसाठी आवश्यक असलेल्या बाबींची पूर्तता करून, २२ जानेवारी, २०१८ रोजी माननीय डी. आर. टी,, पुणे यांचेकडे दावा दाखल केला व डी एस के कंपनीच्या मालमत्ता जप्त कराव्यात तसेच त्यांना मालमत्ता तबदील करण्यास प्रतिबंध करावा असाही अर्ज केला. माननीय डी. आर. टी,, पुणे यांनी ४ जून २०१८ रोजी वसुली प्रमाणपत्र दिले.

**६.** त्या दरम्यान, महाराष्ट्र सरकारनी डी एस के कंपनी तसेच तिचे प्रवर्तक यांच्याविरुद्ध MPID Act तसेच PMLA या कायद्यान्वये कारवाई केली व त्यांच्या मालमत्ता जप्त केल्या.

**७.** रिकव्हरी सर्टिफिकेटच्या पुढील कारवाई डी. आर. टी,, पुणे येथील रिकव्हरी ऑफिसरमार्फत करावी लागते. याबाबत पाठपुरावा करत कॅटॅलिस्टला तारण जमिनीचे सांकेतिक जप्तीचे आदेश २७ नोव्हेंबर २०१८ रोजी मिळाले. नियमानुसार पुन्हा मूल्यांकन करण्यात आले व त्याच अहवाल १७ जुन, २०१९ ला प्राप्त झाला. श्री डी. एस. कुलकर्णी यांनी मूल्यांकन कमी असल्याचा आक्षेप घेतला. त्यास कॅटॅलिस्टने विरोध करत आपली बाजू मांडली. याविषयी २१ ऑक्टोबर २०१९ ला सुनावणी निश्चित तारीख देण्यात आली.

**८.** दरम्यान, बँक ऑफ महाराष्ट्र यांनी १० ऑगस्ट २०१९ ला Insolvency and Bankruptcy Code, 2016 (**आय.बी.सी.**) अंतर्गत अर्ज केला व माननीय एन. सी. एल. टि., मुंबई यांनी आय.बी.सी. च्या तरतुदीनुसार २६ सप्टेंबर २०१९ रोजी Corporate Insolvency Resolution Process (कंपनी पुनर्जीवन प्रक्रिया) सुरु केल्याबाबत आदेश दिला.

९. आय.बी.सी. कायद्यानुसार कंपनीची पुनर्जीवनाची योजना सुरु असताना, कंपनीविरुद्ध कर्जवसुलीसाठी कारवाई सुरु करणे अथवा चालू ठेवता येत नाही. आय.बी.सी. च्या पुनर्जीवनाची योजनेनुसार डी एस के चे सर्व क्रेडिटर्स देणी व सर्व मालमत्ता विचारात घेतली जाते. डिबेंचरहोल्डर्सच्या व्यतिरिक्त क्रेडिटर्समध्ये बँकांचा समावेश आहे. सर्व क्रेडिटर्सची समितीच्या वेळोवेळी सभा होतात व आतापर्यंत अशा नऊ सभा झाल्या. आय.बी.सी. कायद्यानुसार पुनर्जीवनाची योजना १८० दिवसात पूर्ण व्हावी लागते, परंतु त्यास ९० दिवसांची वाढ मिळू शकते.

१०. कोविड-१९ मुळे झालेल्या परिस्थीती नुसार सदर मुदत वाढली आहे. त्यानुसार, पात्र ठरलेल्या कंपनी / व्यक्तींकडून पुनर्जीवन प्रस्ताव देण्याची मुदत ३० ऑगस्ट २०२० पर्यंत आहे. अश्या प्रकारे आलेल्या पुनर्जीवन प्रस्तावांची छाननी क्रेडिटर्सची समिती करेल.

११. पुनर्जीवन प्रस्ताव अंतिमतः डिबेंचरहोल्डर्ससह सर्व क्रेडिटर्सनीच मान्य करावा लागतो. त्याकरिता, येणे रकमेच्या ७५% व क्रेडिटर्सच्या ६०% पेक्षा जास्तने मंजुरी मिळाल्यासच तो प्रस्ताव माननीय एन. सी. एल. टि., मुंबई यांच्या संमतीसाठी ठेवला जातो. माननीय एन. सी. एल. टि., मुंबई यांनी संमती दिल्यास, सदर पुनर्जीवनाची योजना अंमलात आणण्यात येईल. अशा प्रकारे संमत झालेल्या योजनेनुसार, कंपनीचे व्यवहार चालू ठेऊन, येणे रकमेची परतफेड होईल.

१२. जर क्रेडिटर्सनी पुनर्जीवन प्रस्ताव मान्य केला नाही तर माननीय एन. सी. एल. टि., मुंबई, कंपनीची दिवाळखोरी घोषित करेल व आय.बी.सी. कायद्यानुसार कंपनीच्या सर्व मालमत्तेची विक्री करून, विक्रीची रक्कम क्रेडिटर्सना देण्याची प्रक्रिया सुरु करेल.

वरील सर्व बाबी लक्षात ठेऊन, सद्य परिस्थितीचा विचार करता, आय.बी.सी. कायद्यानुसार सुरु असलेल्या कंपनी पुनर्जीवन प्रक्रिया ऑक्टोबर, २०२० अखेर पूर्ण होण्याची शक्यता आहे. यामध्ये MPID Act, PMLA तसेच आय.बी.सी. इत्यादी कायद्यानुसार वेगवेगळ्या प्रकारच्या कारवाई चालू आहेत. तथापि, डिबेंचरहोल्डर्ससह सर्व क्रेडिटर्सना किती व कधी रक्कम मिळेल हे, कश्या प्रकारे पुनर्जीवन प्रस्ताव मिळेल व तो किती यशस्वीपणे अंमलात आणला जातो, यावर अवलंबून आहे.

याबाबत, माहितीसाठी डिबेंचरहोल्डर्सनि वेळोवेळी वर नमूद केलेली डिबेंचर ट्रस्टीची वेबसाईट अथवा मोबाईल अप्लिकेशन पाहावे. तसेच, सर्व डिबेंचरहोल्डर्सना पुन्हा विनंती करण्यात आहे कि, त्यांनी आपला E-mail ID स्वतःचे D-mat खाते असलेल्या बँकेत नोंद असल्याची व बरोबर असल्याची खात्री करावी, जेणेकरून, ईमेलद्वारे पत्रावव्यहार तत्परतेने होऊ शकेल. याबाबत कृपया डिबेंचर ट्रस्टीकडे नोंद असलेल्या E-mail ID ग्राह्य धरता येत नाही याची नोंद घ्यावी. तसेच ज्यांचे डिबेंचर्स D-mat स्वरूपात नाहीत, त्यांनी Registrar & Transfer Agent कडे E-mail ID ची नोंद करावी.

क्रेडिटर्सची समिती, डिबेंचर ट्रस्टीसह, आय.बी.सी. कायद्यानुसार कंपनी पुनर्जीवन प्रक्रिया लवकरात लवकर व्हावी याकरिता प्रयत्नशील आहे.

***